जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २४.०६.२०२५**

'' डिवाईन पॉवर फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणूकीवर आकर्षक नफा देण्याचे आमिष दाखवून लाखो नागरिकांची, करोडो रूपयांची फसवणूक करून, ३ वर्षापासून आपले अस्तित्व लपवून रहात असलेला मुख्य सूत्रधार, संचालक अजय उसारे गजाआड ''

सन २०२२ मध्ये ओरियाना बिझनेस पार्क, ऑफिस क्र. ४०२, रोड नं.२२, वागळे इस्टेट या ठिकाणी डिवाईन पॉवर या कंपनीचे नावे ऑफीस उघडून, कंपनीचे विविध योजनांमध्ये गुंतवणुक केल्यास त्या मोबदल्यात पुढील १५ महिने दरमहा १५ टक्क्याने व्याज देण्याचे आमिष दाखविल्याने, फिर्यादी व इतर ९१ साक्षीदार गुंवतणूकदार यांनी गुंतवणूक केलेल्या ७,१४,९३,३४९/— रू रक्कमेची फसवणुक झाल्याने वागळे इस्टेट पोलीस ठाणे गुरनं । २४२/२०२२ भा.द.वि का. कलम ४२०, ४०६, ४०९, ३४,१२० (ब) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तिय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये दाखल गुन्हयाचा दिनांक ७/१०/२०२४ पासून सायबर पोलीस ठाणे तपास करीत आहे.

सदर गुन्हयाचा मुख्य सूत्रधार, संचालक अजय उसारे हा गुन्हा केल्यापासून मागील ३ वर्षापासून आपली ओळख बदलून, आपले अस्तित्व लपवनू, दुबई, नेपाळ या ठिकाणी रहात होता. सायबर पोलीस ठाणे येथील तपास पथक मपोनि/श्रीमती.प्रियांका शेळके, सपोनि प्रदीप सरफरे, चेतन पाटील, पोना/धिरज गायकवाड, प्रविण आव्हाड यांनी नमूद पाहिजे आरोपी अजय उसारे याचा तांत्रिक तपासान्वये शोध घेवून, डेहराडून, उत्तराखंड येथून ताब्यात घेवून त्यास दिनांक १३/६/२०२५ रोजी २०:०६ वा. अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपीताची दिनांक. २६/६/२०२५ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर आहे. सदर गुन्हयात यापुर्वी ५ आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून सुमार ८ कोटी रक्कमेची मालमत्ता संरक्षित करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा तपास मपोनि प्रियांका शेळके करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा/सायबर श्री.पराग मणेरे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा/सायबर श्री.दत्तात्रय पाबळे, सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश वारके, पोनि/प्रियंका शेळके, सपोनि मंगलसिंग चव्हाण, सपोनि/प्रदिप सरफरे, सपोनि चेतन पाटील, पोउपनि अविनाश बाबरेकर, पोकॉ/गणेश ईलग, पोकॉ/राजेंद्र नेगी, पोकॉ/ प्रविण इंगळे, पोकॉ/धिरज गायकवाड, यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर